**प्रास्ताविक/पार्श्वभूमी :-**

**माझे जीवनगाणे व्यथा असो, आनंद असू दे**

**प्रकाश अथवा तिमिर असू दे...... गावे नित्य तराणे !**

`हे जीवन सुंदर आहे` असा संदेश देणारी आपली भारतीय संस्कृती आहे.

परंतु आज मात्र कोणतेही वर्तमान पत्र उघडले तर एक-दोनतरी आत्महत्येच्या बातम्या असतातच. कधी आर्थिक कारण कधी कौटुंबिक ! अलीकडे तर विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणातही बरीच मोठी वाढ झाली आहे. या सगळ्यांच्या मागे मानसिक ताण-तणाव हे मुख्य कारण आहे. म्हणून मानसशास्त्रीय समुपदेशनाची आज अत्यंत तीव्रतेने गरज जाणवत आहे. त्यासाठी भारतीय विद्या संशोधन केंद्राने अखिल भारतीय स्तरावरची मानसशास्त्र परिषद घेतली. त्यातून दिलास मार्गदर्शन केंद्र सुरु करण्याची प्रेरणा मिळाली.

ही सर्व प्रेरणा जिच्यापासून घेतली ती सत्त्कार्योत्तेजक सभा ही भारतीय विद्या संशोधन केंद्राची मातृसंस्था आहे. **१२५** वर्षापूर्वी त्यावेळच्या संपूर्ण खान्देशातील **`खान्देशचे टिळक`** असे नावलौकिक असलेले समाजाचे, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक या सर्व अंगाने नेतृत्व करणारे महान अग्रणी कै.शंकर श्रीकृष्ण देव तथा नानासाहेब देव यांनी इ.स.१८९३ साली सभेची स्थापना केली.

सत्कार्योत्तेजक सभेचे-स्थान-समाजात राजकीय व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे अमोघ असे साधनच त्यांनी निर्माण केले होते. मूळात नानासाहेब देवांचा पिंड संशोधनाचा. म्हणूनच त्यांनी श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या देशभरातील मठातील बाडांचे संकलन करुन संशोधनार्थ ते सर्व श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराच्या रुपाने समाजाला समर्पित केले.

सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेचा मुळ हेतू लक्षात घेऊन **इ.स.१९९३** मध्ये भारतीय विद्या संशोधन केंद्र स्थापन केले.

श्री समर्थ वाग्देवता मंदिरातील ऐतिहासिक कागदपत्रांचे संकलन व सद्यस्थितीत समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांवर संशोधन करणे, प्रकल्प राबविणे, विकास पथ निर्देशन करणे हा हेतू धरुन भारतीय विद्या संशोधन केंद्राने आपले कार्य सुरु केले. व्यवस्थापनातील भारतीय सहभाग, महिलांचा सामाजिक दर्जा, त्यांच्या आरोग्य समस्या, पाणी व्यवस्थापन, पारंपारिक शेती, जैविक रासायनिक

कचरा व्यवस्थापन, वैद्यकीय कायदा, प्रदुषण इ. प्रकल्प राबविले, विकासाच्या संदर्भात **`व्यक्तिमत्वाचा पंचकोषात्मक विकास`** या भारतीय तत्वज्ञानावर आधारित संकल्पनेचा तीन वर्षे प्रत्यक्ष प्रयोग केला व त्याच्या सत्यतेची प्रचीती घेऊन या संशोधनावर आधारित एक मार्गदर्शक पुस्तक व्यक्तीमत्वाचा पंचकोषीय विकास प्रसिध्द केले. त्याच प्रमाणे इ.स. २००३ साली भारतीय मानसशास्त्रावर आधारित अखिल भारतीय पातळीवर एक चर्चासत्राचे आयोजन केले व त्यातील निवडक शोध निबंधावर आधारित **Glimpses of Indian Psychology** या पुस्तकाचे प्रकाशन केले.

या केंद्राद्वारे विद्यार्थी वर्गाच्या शैक्षणिक समस्या, कौटुंबिक समस्या, सामाजिक समायोजन, पालक-बालक संबंध, ज्येष्ठ नागरिक समस्या, ताण-तणाव संबंधी विद्यार्थी व व्यावसायिक लोकांचे प्रश्न निवारण इ. संबंधी मार्गदर्शन केले जाते. व्यक्तिमत्व विकास, व्यवसाय मार्गदर्शन, बुध्दीमत्ता मापन, इ. बाबतीतही मार्गदर्शन केले जाते. तसेच काही संशोधन प्रकल्प हाती घेतले जातात.

## समुपदेशन मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम

## (Post Graduate Diploma in Counseling Psychology )

### हेतु :-

आजच्या आधुनिक जागतिकीकरणाच्या युगात ज्ञानाच्या प्रस्फोटाने जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रचंड वेगाने बदल होत आहेत. जग झपाट्याने बदलत आहे. या बदलत्या प्रवाहात सामील होण्यासाठी प्रत्येक माणसाला स्वत:मधे बदल घडविण्याची इच्छा असते. समाजाच्या गतिमान प्रवाहाबरोबर त्याला स्वत:चे जीवनही प्रवाहित करायचे असते. परंतु प्रत्येक माणसाला स्वत:मध्ये योग्य तो बदल घडवता येईलच असे नाही. त्यामुळे जीवनात यशस्वी होण्याकरिता आणि एक उत्तम नागारिक म्हणून आपली सामाजिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्याला कुणाची तरी मदत हवी असते. अशावेळी समुपदेशकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते; कारण तो व्यक्तीच्या क्षमता ओळखू शकतो. व्यक्तीमधील शक्तीस्थाने आणि दुर्बलता जाणून घेऊन पुढे येणाऱ्या समस्यांना तोंड देण्यासाठी व्यक्तीला सज्ज करतो. एक मित्र म्हणून अशा व्यक्तींना मार्गदर्शन करतो. केवळ वर्तमानकाळातीलच नव्हे तर भविष्य काळात येणाऱ्या नवनविन आव्हांनाना सामोरे जाण्याचे सामर्थ्य व्यक्तीमध्ये निर्माण करणे ही समुपदेशकाची जबाबदारी आहे.

**स्थूल उद्दिष्टे :-** १) भारतीय मानसशास्त्राची मुलभूत तत्त्वे, सिध्दांत आणि विविध पैलूंची विद्यार्थ्यांना ओळख होईल.

२) मानसिक दृष्ट्या दुर्बल व्यक्तींबद्दल विद्यार्थ्यांना आपुलकी, प्रेम निर्माण होईल.

३) दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी आणि मानसिक दृष्ट्या दुर्बल व्यक्तींना समुपदेशन करण्याची योग्यता असणारे तज्ञ समुपदेशक विद्यार्थ्यांमधून निर्माण होतील.

**सुक्ष्म- उद्दिष्टे :-** १) व्यक्ती आणि समाजाच्या मानसिक स्वास्थ्यासाठी मदत करणे.

२) काळाच्या गरजेनुसार समुपदेशनाची कौशल्ये आत्मसात करणे व विकसित करणे.

३) सकारात्मक जीवनशैली अंगी कशी बाणवावी याविषयी समाजामध्ये जागृती करणे.

**युजीसी आदेश क्र. D.O.No.F.1-111/2014 (cpp.11) 27 जानेवारी 2016** नुसार प्रत्येक शाळा व महाविद्यालयातून एक समुपदेशक असावा असे नमूद केले आहे. शाळांमधून विद्यार्थ्यांच्या समस्या वाढत आहेत तसेच पालकांचेही आपल्या पाल्याबाबत प्रश्न वाढत आहेत अशा परिस्थितीत शिक्षक जरी समुपदेशकाची भुमिका करत असेल तरी त्यांना ही काही मर्यादा आहेत.

येत्या काळात प्रत्येक शाळा व महाविद्यालयातून समुपेदशक नेमले जाण्याची शक्यता आहे. सत्कार्योत्तेजक सभेचे भारतीय विद्या संशोधन केंद्रांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव पदव्युत्तर समुपदेशन मानसशास्त्र पदविका अर्थात Post Graduate Diploma in Counseling Psychology कोर्स सुरु आहे. ह्या कोर्सचा तपशील-

1) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव ची मान्यता

2) सदर कोर्स शनिवार व रविवार दोन दिवस जुन ते एप्रिल ह्या कालावधीत आहे.

3) कोणत्याही शाखेचा पदवीधर, वयाची अट नाही.

4) सदर कोर्स वर्षभराच्या असून, यशस्वी विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्र देण्यात येईल.

## अभ्यासक्रमाची रचना :-

**पेपर (लेखी) १ - भारतीय व पाश्चात्य दृष्टीकोनातून मानसशास्त्राचे विविध पैलू**

**पेपर (लेखी) २ - मानसशास्त्रीय समुपदेशन आणि उपयोजन**

**पेपर (लेखी) ३ - मानसशास्त्रीय मापन**

**श्रेणीबिंदू आणि मार्कांचे विभागणी**

| **स्वरुप** | **लेखी-१** | | **लेखी-२** | | **प्रात्यक्षिक-३** | | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रेणी - | ६ | + | ६ | + | ८ | = | **२० श्रेणी बिंदू** |
| गुण - | १०० | + | १०० | + | १०० | = | **३०० गुण** |

| बहि:स्थ | अंतर्गत | बहि:स्थ | अंतर्गत | बहि:स्थ | अंतर्गत |
|---|---|---|---|---|---|
| ६० | ४० | ६० | ४० | ६० | ४० |

**सूचनांचे माध्यम - मराठी, इंग्रजी**

**उत्तीर्णतेचे नियम -** बहि:स्थ परीक्षा २४ गुण आणि अंतर्गत परीक्षा १६ गुण = एकुण ४० गुण लेखी अभ्यासक्रमासाठी ९० तास आणि प्रात्यक्षिकासाठी १२० तास प्रत्येकी ६० मिनिट प्रमाण ठरवले आहेत.

## अंतर्गत परीक्षण (Internship)

या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला अंतर्गत प्रशिक्षण (Internship) आवश्यक आहे. १५ दिवसाचे अंतर्गत प्रशिक्षण हे मनोरुग्णालय किंवा समुपदेशन केंद्र यामध्ये आवश्यक आहे तसेच वृध्दाश्रम, मतिमंद मुलांची शाळा, मूक-बधिर मुलांची शाळा इथे भेटी देणे आवश्यक आहे.

***************